पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८, लेखा विभाग
क्र.लेखा/२९/कावि/७२५/२०२१
दिनांक :- १७/०५/२०२१

विषय : लेखा संगणक प्रणाली मधील बिल फॉर्म नं-१४ बाबत.

परिपत्रक,

लेखा संगणक प्रणालीमधून नॅशनल म्युनिसिपल अकाऊंटींग मॅन्युअल नुसार फॉर्म नं-१४ ( जुना फॉर्म नं-२२ ) तयार करणेची सुविधा करणेत आलेली आहे. सदरची सुविधा ही बिल फॉर्म नं-१४ ( जुना फॉर्म नं-२२ ) मध्ये एकरूपता आणण्याकरीता करणेत आलेली आहे. सदर फॉर्म नं-१४ हा संगणक प्रणालीमध्ये संचयीत होणार असल्याने भविष्यात काही कारणास्तव आवश्यक असल्यास सदर फॉर्म नं-१४ / देयक हे संगणक प्रणालीमध्ये उपलब्ध असणार आहे. त्यानुसार सर्व विभागांना सुचीत करणेत येते की दि.२४/०५/२०२१ पासुन महसुली देयके ही सदर संगणक प्रणालीमध्ये उपलब्ध करून दिलेल्या फॉर्म नं-१४ मधून तयार करून अदायगीकामी लेखा विभागाकडे सादर करावीत. फॉर्म नं-१४ नमुना माहिती करीता सोबत जोडलेला आहे. तरी सर्व विभागांनी सदरचे परिपत्रक विभागातील संबधीत कर्मचारी यांचे निदर्शनास आणून देण्यात यावे व त्यानुसार कार्यवाही करणेबाबत दक्षता घ्यावी. विभागांना फॉर्म नं-१४ तयार करताना काही अडचण असल्यास लेखा विभागास संपर्क करावा.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८

प्रत,
सर्व संबंधीत विभाग